नि. दि. दा. क्र. २२/२०१८
देवाजी वि. पुंडलिक व इतर
**CNR No. : MHGO06-000350-2018**

## नि. क्र. ५ खालील आदेश

वादीने अर्ज नि. ५ दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम—३९, नियम— १ व २ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जातील संक्षिप्त कथन असे की, वादीने मौजा चिचोली, ता. अर्जुनी/मोरगांव येथील गट क्र. १९७ आराजी ४.९२ हे. आर. पैकी ०.९८ हे. आर. या शेतजमिनीवर सन १९७५—७६ पासून कब्जा व वहिवाट असून त्या जमिनीचा पट्टा शासनाकडून दिनांक ३०/०१/२०१० रोजी वादीला मिळालेला आहे. सदर जमिनीची चतु:सीमा खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस— गट क्र. २०१ मधील तलाव;

पश्चिमेस— जनार्धन रावजी मलखांबे यांची शेती;

उत्तरेस— नाला व गट क्र. २०० आणि

दक्षिणेस— गट क्र. १९७ ची उर्वरीत जागा.

(यापुढे सदर जमिनीस संक्षेपासाठी ‘दाव्यातील जमीन’ असे संबोधण्यात येईल).

३. वादीने पुढे असे कथन केले की, वादीच्या दाव्यातील जमिनीशी प्रतिवादींचे कोणतेही संबंध नसताना प्रतिवादी क्र. १ हा वादीला अडथळा करीत असतो. दिनांक ०५/०६/२०१८ रोजी सकाळी अंदाजे ९.३० वाजताचे सुमारास दाव्यातील जमिनीवर वादी काम करीत असताना प्रतिवादी क्र. १ हा त्याठिकाणी

आला व वादीला ''यावर्षी तू ही जमीन कशी काय पेरतोस, ते पाहून टाकीन, जमीन पेरलीस तर तंगडे तोडून टाकीन'' अशा प्रकारे धमकी दिली. त्यानंतर दिनांक ०८/०६/२०१८ रोजी वादीने प्रतिवादी क्र. १ ला वकिलामार्फत नोटीस पाठवले व अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करू नये म्हणून सुचवले. सदर नोटीस नोटीस प्राप्त झाल्यानंतर दिनांक २३/०६/२०१८ रोजी प्रतिवादी क्र. १ हा प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना सोबत घेवून आला व बळजबरीने दाव्यातील जमिनीत येवून कुंपण करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी वादी, त्यांचा मुलगा व भाउ यांनी प्रतिवादींना अडवण्याचा प्रयत्न केला असता प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी वादी व त्यांच्या मुलाला ढकलढुकल करून अश्लील शिवीगाळ केली व जिवाने मारण्याची धमकी दिली. सदर घटनेची तक्रार वादीने पोलीस ठाणे, केशोरी येथे केली. पोलीसांनी प्रतिवादींना दाव्यातील जमिनीवर जावून वादीच्या कब्जास अडथळा करू नये अशी समज दिली. असे असतानाही दिनांक ०४/०७/२०१८ रोजी वादी दाव्यातील जमिनीमध्ये काम करीत असताना प्रतिवादींनी वादीला ''तू आमची रिपोर्ट् देवून काय बिघडवलीस, तू कसा काय रोवणा करतो आम्ही पाहू'' अशा प्रकारे बोलून धमकी दिली. त्यामुळे वादीस प्रतिवादींविरूद्ध मनाई हुकूमाचा दावा दाखल करावा लागला असून अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

४. प्रतिवादींनी अर्जातील कथनास शह देण्यासाठी त्यांचे लेखी म्हणणे नि. क्र. २३ वर दाखल केले. प्रतिवादींनी अर्जातील कथन नाकारून असे प्रतिपादन केले की, दाव्यातील जमिनीवर मौजा चिचोली हे पुनःवर्सित गाव सन १९८६–८७ मध्ये वसलेले असून दाव्यातील जमिनीवर वादीचा कधीही कब्जा नव्हता. दाव्यातील जमीन ही शेती उपयोगी नाही. दाव्यातील जमिनीच्या पूर्वेला गट क्र. २०१ ही

जमीन तलावाची असून त्याठिकाणी वादी अतिक्रमण करून शेती करीत असतो. वादीने सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून जमिनीचा पट्टा देण्याच्या वेळी गट क्र. २०१ चा उल्लेख न करता दाव्यातील जमिनीचा कागदोपत्री उल्लेख केला. याप्रमाणे वादीने दाव्यातील जमिनीचा पट्टा मिळवला. वादीचा गट क्र. २०१ या जमिनीवर वास्तविक अतिक्रमण असून गट क्र. १९७ मधील पट्टयाच्या दानीची जागा हडपण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. गट क्र. २०१ हा जेव्हा पावसाळ्यात पाण्याने भरतो, त्यावेळी वादी तलावाचे तुडुंब सतत फोडतो. याबाबत प्रतिवादी क्र. १ व इतर गावकऱ्यांनी अनेकदा वादीची तहसिलदार, वन विभाग तसेच पाटबंधारे विभाग यांचेकडे तक्रार केली. त्यामुळे त्याच्यावर कारवाई होईल म्हणून वादीने खोटा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी दाव्यातील जमिननीवर कधीही अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला नाही. सबब त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

५. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील या टप्प्यावर सादर केलेल्या पुराव्याचे मुल्यांकनाअंती मी माझे निष्कर्ष खालील मुद्यांवर कारणांसह येणेप्रमाणे नोंदवत आहे :

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १ | वादीने त्याचा अर्ज प्रथमदर्शनी असल्याचे सिद्ध केले का ? | होकारार्थी. |
| २ | अनुकुलतेचा कल कुणाचे पक्षात आहे ? | वादीचे पक्षात |
| ३ | अर्ज नामंजूर केल्यास वादीची अपरिमित हानी होणार आहे का ? | होकारार्थी |
| ४ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## —: **कारणे मीमांसा** :—

६. **मुद्दा क्र. १ बाबत** : वादीचा अर्ज प्रथमदर्शनी आहे अगर कसे हे ठरविण्याकरिता दाव्यातील जमिनीवर वादीचा ताबा आहे अगर कसे हे ठरविणे आवश्यक आहे. वादीच्या कथनाप्रमाणे दाव्यातील जमीन शासनाकडून त्यांना पट्टयाने मिळालेली असून सन १९७५–७६ पासून त्या जमिनीवर त्याचा कब्जा आहे. नि. क्र. ४ सोबत दस्त क्र. १ हा दाव्यातील जमिनीचा सात बारा उतारा असून त्याचे अवलोकन केले असता दाव्यातील जमिनीच्या सात बारा उतारावर वादीच्या नावाची नोंद ०.९८ हे. आर. वर झाली असल्याचे दिसून येते. याशिवाय वादीने दस्त क्र. ४ वर पट्टयाची प्रत दाखल केलेली असून दाव्यातील जमीन वादीला पट्टयाने मिळाली असल्याचे दिसते.

७. प्रतिवादींनी असे कथन केले की, वादीचा दाव्यातील जमिनीवर वास्तविक कब्जा नसून त्याचा गट क्र. २०१ या तलावाच्या जागेवर अतिक्रमण आहे. वादीने पट्टा देण्याच्या वेळी गट क्र. २०१ या जागेचा उल्लेख न करता दाव्यातील जमिनीचा उल्लेख केला. याप्रमाणे दाव्यातील जमिनीचा वादीला पट्टा मिळालेला आहे. परंतु उपरोक्त तोंडी कथनाव्यतिरिक्त कोणताही दस्तऐवजीय पुरावा त्यासंबंधाने वादीने दाखल केला नाही. वादीचे गट क्र. २०१ वर अतिक्रमण असताना त्याला शासनाकडून दाव्यातील जमिनीचा पट्टा मिळेल ही बाब पटण्यासारखी नाही. याशिवाय वादीने दाव्यामध्ये नमूद केलेल्या चतु:सीमा व नि. क्र. ४ सोबत दस्त क्र. ४ वर दिलेल्या पट्टयाची प्रतमधील चतु:सीमा यामध्ये समानता दिसून येत आहे. याशिवाय या टप्प्यावर अर्ज प्रथमदर्शनी असल्याचे सिद्ध करण्याकरिता वादीने जे कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे, तो विश्‍वसनीय असून त्यावरून वादीचा दाव्यातील जमिनीवर ताबा असल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध झाले.

किंबहुना वादीने त्यांचा अर्ज प्रथमदर्शनी असल्याचे सिद्ध केले, असे माझे स्पष्ट मत आहे. सबब मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

८. **मुद्दे क्र. २ ते ४ बाबत** : आता अनुकलतेचा कल कुणाचे पक्षात आहे व अर्ज नामंजूर केल्यास वादीची अपरिमीत हानी अटळ आहे अगर कसे हे पाहणे आवश्यक आहे. उपरोक्त मुद्याचा निष्कर्ष लक्षात घेता ज्याअर्थी, वादीचा अर्ज प्रथमदर्शनी असल्याचे सिद्ध झाले, त्याअर्थी अनुकूलतेचा कल वादीचे पक्षात आहे. वादीच्या कथनाप्रमाणे दिनांक ०५/०६/२०१८ रोजी सकाळी अंदाजे ९.३० वाजताचे सुमारास दाव्यातील जमिनीवर वादी काम करीत असताना प्रतिवादी क्र. १ हा त्याठिकाणी आला व वादीला ''यावर्षी तू ही जमीन कशी काय पेरतोस, ते पाहून टाकीन, जमीन पेरलीस तर तंगडे तोडून टाकीन'' अशा प्रकारे धमकी दिली. त्यानंतर दिनांक ०८/०६/२०१८ रोजी वादीने प्रतिवादी क्र. १ ला वकिलामार्फत नोटीस पाठवले व अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करू नये म्हणून सुचवले. नि. क्र. ४ सोबत दस्त क्र. ६ वर वादीने प्रतिवादी क्र. १ ला पाठवलेल्या नोटीसाची प्रत दाखल केलेली आहे. वादीचे पुढे असे कथन आहे की, दिनांक २३/०६/२०१८ रोजी सर्व प्रतिवादींकडून वादीच्या ताब्यास अडथळा झाला. तसेच दिनांक ०४/०७/२०१८ रोजीसुद्धा प्रतिवादींकडून वादीला अडथळा झाला. दिनांक २३/०६/२०१८ रोजीच्या घटनेबाबत प्रतिवादींची दिलेली रिपोर्ट नि. क्र. ४ सोबत दस्त क्र. ९ वर वादीने दाखल केलेली आहे. सदर बाब लक्षात घेता प्रतिवादी दाव्यातील जमिनीमध्ये वादीच्या ताब्यात अडथळा करण्याच्या प्रयत्नात असल्याचे दिसते. ज्याअर्थी दाव्यातील जमीन वादीचा ताबा असल्याचे व त्याच्या ताब्यास प्रतिवादींकडून अडथळा करण्याचा प्रयत्न होत असल्याचे या टप्प्यावर वादीने सिद्ध

केले, त्याअर्थी अर्ज नामंजूर केल्यास वादीची हानी अटळ आहे. याशिवाय वादीचा अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादी दाव्यातील जमिनीवरील वादीचा ताबा हिसकावून घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. उलटपक्षी, अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीची कोणतीही हानी होणार नाही, कारण दाव्यातील जमिनीशी प्रतिवादींचा कोणताही संबंध नाही. प्राप्त परिस्थिती व उपरोक्त विवेचन लक्षात घेता मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, अनुकुलतेचा कल वादीचे पक्षात असून अर्ज नामंजूर केल्यास वादीची अपरिमीत हानी अटळ आहे. सबब मी मुद्दे क्र. २ व ३ चे निष्कर्ष वरीलप्रमाणे नोंदवून मुद्दा क्र. ४ चा निष्कर्ष नोंदविण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादींस, त्यांचे नातेवाईक, त्यांचे प्रतिनीधी व त्यांचे मार्फत इतर यांस मौजा मौजा चिचोली, ता. अर्जुनी/मोरगांव येथील गट क्र. १९७ आराजी ४. ९२ हे. आर. पैकी ०.९८ हे. आर. दाव्यातील जमिनीवर वादीच्या ताब्यास अडथळा करण्यापासून दाव्याचा निकाल लागेपर्यंत तातपुरता मनाई हुकूमाद्वारे प्रतिबंधीत करण्यात येते.

३. अर्जाचा खर्च मुळ दाव्यासोबत.

स्वा/—
दिनांक : ११/०१/२०१९ ( स्व. ली. रामटेके )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
अर्जनी/मोरगाव.